# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

१००) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३.०२.२०२६

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (०६/०२/२०२६ ते १२/०२/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१४/०२/२०२६ ते १८/०२/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २९.२ | २९.६ | २९.६ | २९.८ | ३०.६ | ३१.२ | ३१.४ | कमाल तापमान (अंसे) | ३३ | ३४ | ३३ | ३१ | ३१ |
| १३.१ | १३.१ | १३.३ | १३.१ | १३.७ | १४.३ | १४.५ | किमान तापमान (अंसे) | १५ | १५ | १६ | १६ | १५ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | २ | २ | ३ | २ | २ |
| ८२ | ८२ | ८१ | ८२ | ७७ | ८३ | ७६ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५१ | ४७ | ४४ | ४३ | ४७ |
| ४८ | ४९ | ४८ | ५० | ४३ | ३८ | ४१ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १७ | १६ | १५ | १५ | १६ |
| २.१ | २.० | २.१ | १.८ | १.० | ०.८ | ०.९ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ३ | २ | ६ | ६ | ३ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **दि. १६ फेब्रुवारी रोजी आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) शेतकरी बंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वतः ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा. |
| संदेश | | उन्हाळी भुईमूग पिकाची पेरणी १५ फेब्रुवारी पूर्वी पूर्ण करून घ्यावी. पेरणीचे वेळी रात्रीचे किमान तापमान १८ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त असावे. |
| सुरू ऊस | लागवड | सुरू उसाची लागवड १५ फेब्रुवारी पूर्वी पूर्ण करावी.<br>**ऊस बेणे निवड:** बेणे मळयात वाढविलेले ०९ ते ११ महिने वयाचे निरोगी, कोवळे, जाड, लांब कांडयाचे, रसरशीत आणि अनुवांशिक दृष्टचा शुध्द बेणे वापरल्यास उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ होते. दर ३ वर्षांनी नव्याने बेणे मळयातील बेणे वापरावे. ऊस बेणे मळा करणेसाठी २० डोळे असलेल्या १० उसाचा वापर केल्यास नंतरच्या वर्षात १००० उसापासून दोन डोळयाची २०००० टिपरी वापरून दोन एकरावर उसाची लागवड करता येते.<br>**बेणे प्रक्रिया:** बुरशीजन्य रोगांचा बंदोबस्त करण्यासाठी बेणे लागणीपूर्वी १० लिटर पाण्यात १० ग्रॅम कार्बेन्डॅझिमची १० मिनीटांसाठी बेणे प्रक्रिया करावी. त्यानंतर हेक्टरी १० किलो ॲसेटोबॅक्टर १.२५ किलो पी.एस.बी. १०० लिटर पाण्यात ३० मिनिटे जीवाणू बीजप्रक्रिया करावी. यामुळे नत्रखतामध्ये ५०% ची तर स्फुरदखतामध्ये २५% ची बचत करता येते. |
| उन्हाळी भुईमूग | पेरणी | **बियाणे:** भुईमूगाचे वाणनिहाय बियाणे प्रति हेक्टरी खालीलप्रमाणे वापरावे.<br>१०० किलो : फुले चैतन्य (केडीजी-१६०), फुले धनी (जे. एल. १०८५)<br>१२० ते १२५ किलो : फुले उन्नती, फुले भारती, फुले वारणा, फुले मोरणा<br>**बीजप्रक्रीया:** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (घनरूप किंवा द्रवरूप) चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणेसावलीत सुकवून पेरावे.<br>**पेरणी अंतर:** दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. व दोन रोपातील अंतर १० सें.मी. ठेवावे.<br>**पेरणी:** उन्हाळी हंगामात जमीन ओलवून नंतर वापशावर पाभरीने अथवा टोकण पद्धतीने पेरणी करावी. टोकण पद्धतीने पेरणी केल्यास बियाणे कमी लागुन उगवण चांगली होते. |
| हरभरा | घाटे सुटण्याची अवस्था | **मर रोगाचे नियंत्रण**<br>हरभरा मर रोगाचे यशस्वी नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. एकदा झाल्यानंतर मर रोग पूर्णपणे बरा होत नाही. त्यामुळे वेळीच रोगग्रस्त झाडांचे निर्मूलन, योग्य पाणी व्यवस्थापन व जैविक रासायनिक उपायांचा समन्वय केल्यास रोगाचा प्रसार रोखता येतो आणि उत्पादनात होणारे मोठे आर्थिक नुकसान निश्चितच टाळता येऊ शकते.<br>रोगग्रस्त व अर्धवट वाळलेली झाडे मुळासकट उपटून शेताबाहेर नष्ट करावीत. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | शेतात पाणी साचू देऊ नये. गरजेनुसार हलके पाणी द्यावे.<br>ट्रायकोडर्मा व्हिरिडी किंवा ट्रायकोडर्मा हार्झियानम २.५ ते ५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणे शेणखतात मिसळून ओळींमध्ये द्यावे.<br>ओळींमध्ये नीमकेकचा २५० ते ५०० किलो प्रति हेक्टर प्रमाणात वापर करावा.<br>शेणखत व सेंद्रिय खतांचा वापर वाढवून जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांचे संतुलन सुधारावे.<br>चांगला निचरा असलेली जमीन निवडून नत्र खताचा अतिरेक टाळावा.<br>हरभऱ्यानंतर पुढील हंगामापूर्वी ज्वारी, बाजरी, मका यांसारखी पिके घेऊन पीक फेरपालट करावी. |
| **हरभरा** | **घाटे सुटण्याची अवस्था** | **<u>घाटे आळीच्या नियंत्रणाकरीताचे शिफारशीत किटकांनाशके</u> (प्रमाण प्रती१० लि. पाणी)**<br>क्लोरोंन्ट्रानिलीप्रोल (४७.८५ टक्के एससी) ०.८३ मिलि<br>क्लोरफेनपायर (२४० ग्रॅम/लि एससी) १६-२० मिलि<br>इमामेक्टीन बेन्झोएट (५ टक्के एसजी) ४.४ ग्रॅम<br>इमामेक्टीन बेन्झोएट (१.९० टक्के ईसी) ७.५ मिलि<br>इंडोक्झाकार्ब (१४.५० टक्के एससी) ८-१० मिलि<br>इंडोक्झाकार्ब (१५.८० टक्के ईसी) ६.६६ मिलि<br>लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५ टक्के ईसी) १०-१२ मिलि<br>स्पिनेटोरम (११.७० टक्के एससी) ७.५-९ मिलि<br>क्लोर अँन्ट्रानीलीप्रोल (५.२ टक्के) + नोव्हॅलुरॉन (८.५ टक्के एससी) ८ मिलि<br>फ्लुबेन्डायअमाइड (८.३३ टक्के) + डेल्टामेथ्रीन (५.५६ टक्के एससी) ५ मिलि<br>नोव्हॅलुरॉन (५.२५ टक्के) + इमामेक्टीन बेन्झोएट (०.९ टक्के एससी) १७.५ मिलि<br>नोव्हॅल्युरॉन (५.२५ टक्के) + इंडोक्झाकार्ब (४.५० टक्के एससी) १६.५-१७.५ मिलि |
| **करडई** | | करडई पिकामध्ये घाटे अळीची अंडी किंवा अळी आढळली तर हेलीओकील ५०० मिली ५०० लिटर पाण्यात प्रती हेक्टरवर फवारणी करावी. तसेच घाटे आळीचे कामगंध सापळे हेक्टरी ५ प्रमाणे लावावेत आणि प्रादुर्भाव ओळखावा. |
| **मका** | **फुलोर्याची अवस्था** | अमेरिकन लष्करी अळीचे नियंत्रण:<br><u>यांत्रिक पद्धती:</u> अंडीपुंज, समुहातील अळया वेचून राकेलमिश्रित पाण्यात टाकुन नष्ट कराव्यात. सामुहिकरित्या नर पतंग आकर्षित करून मारावेत. अळीचा प्रादुर्भाव लक्ष्यात येण्यासाठी प्रति एकरी चार कामगंध सापळे लावावेत.<br><u>रासायनिक नियंत्रण:</u><br>क्लोरँट्रनिलीप्रोल १८.५% एस सी ४० जी.ए.आय./ हेक्टर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५% एस जी ८ ग्रॅम प्रति लि. या प्रमाणात फवारणी करावी. किंवा<br>स्पिनेटोरम ११.७ एस सी ०.५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. किंवा<br>इमामेक्टीन ५%+ बेन्झोएट ल्युफेनुरॉन ४०% डब्लू.जी.०.२ ग्रॅम किंवा नोव्हालुरॉन ५.२५% + इमामेक्टीन बेंझोएट ०.९% एस सी ३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| **गहू** | **दाणे भरण्याची अवस्था** | गहू पिकास पेरणीनंतर ८० ते ८५ दिवसानंतर दाणे भरण्याच्या अवस्थेमध्ये वारा शांत असताना पाणी द्यावे जेणेकरून गहू पिक पडणार नाही.<br>गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे, प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब ७५% डब्ल्यु पी ३० ग्रॅम १० लिटर पाण्यातून किंवा टेब्युकोनॅझोल ५०% + टायफ्लोक्झीस्ट्रोबीन २५% डब्ल्यु जी १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| **रब्बी ज्वारी** | **काढणी** | पक्व होत असलेल्या ज्वारी पिकाचे पक्षांपासून संरक्षण करावे. ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपका दिसून आल्यास ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत. तदनंतर पिकाची मळणी करुन सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **सूर्यफुल** | **काढणी** | सूर्यफुल पीक सर्वसाधारणपणे ९० ते ९५ दिवसांमध्ये काढणीसाठी परिपक्व होते. पिकाची पाने वाळल्यानंतर काढणी १२ ते १४% ओलावाअसतानाकणसे विळीने कापून करावी. |
| **रांगडा कांदा** | **काढणी** | रांगडा कांदयाची ५० टक्के माना पडल्यानंतर काढणी करावी.<br>सततची पानाची वाढ चालू असल्यास हलकासा ड्रम फिरवावा व त्यानंतर १५ ते २० दिवसांनी कांदयाची काढणी करावी. काढणी नंतर कांदा ४-५ दिवस पातीसहीत शेतात ओळीत सुकवावा.<br>३ ते ४ से.मी. मान ठेवून पात कापावी.<br>कांदयाची प्रतवारी करुन कांदा विक्रीसाठी पाठवावा. |

**स्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

हवामान आधारीत कृषि सल्ला
ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : १३.०२.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा
प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.